बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रम महाविद्यालयास मान्यता देण्याबाबत.

कै. केदारी रेडेकर शिक्षण संस्था, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर संचलित केदारी रेडेकर कॉलेज ऑफ नर्सिंग, मु.पो. बडयाची वाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर-२०२४/प्र.क्र.४०२/२४/शिक्षण-१

९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.

दिनांक: २६ सप्टेंबर, २०२४.

वाचा :
१) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-५/२८६३/२०२३, दि.२२.१२.२०२३
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१, दि. २८.०२. २०१८.
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.डीएमईआर-११०१४/१६९/२०२४-सीईटीआयटी, दि.१९.०६.२०२४.

**प्रस्तावना:**

कै. केदारी रेडेकर शिक्षण संस्था, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर संचलित केदारी रेडेकर कॉलेज ऑफ नर्सिंग, मु.पो. बडयाची वाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर या महाविद्यालयाचा बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. (१) येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता.महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली होती.

संदर्भ क्र.(२) येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर संस्थेची वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समिती व आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी उक्त संस्था बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचेकडून प्राप्त शिफारस विचारात घेऊन, उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी ५० (पन्नास) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी संदर्भ क्र. (३) अन्वये सक्षमता तपासणी समितीच्या अहवालाच्या आधारावर केलेली शिफारस विचारात घेऊन, कै. केदारी रेडेकर शिक्षण संस्था, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर संचलित केदारी रेडेकर कॉलेज ऑफ नर्सिंग, मु.पो. बडयाची वाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर या महाविद्यालयास सन २०२४-२५ साठी ५० (पन्नास) विद्यार्थी प्रवेश

सदर शासन निर्णय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ च्या कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, ८ वा मजला, एनबीसीसी सेंटर, प्लॉट नं.२, कम्युनिटी सेंटर, ओखला फेज-१, नवी दिल्ली-११० ०२०.
५. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
८. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट-४००००१.
९. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३ रा मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
१०. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१
११. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
१२. अध्यक्ष/सचिव, कै. केदारी रेडेकर शिक्षण संस्था, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
१३. निवडनस्ती (शिक्षण-१).

Principal
Kedari Redekar College of
Nursing (B.Sc.Nursing)